देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर.

**(विधी व न्याय विभाग अंतर्गत)**

२४०२ "ए " वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०
E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com

**क्र. देव वशि जा.** ८५०/२०२३ **दिनांक** - 20 MAR 2023

## दरपत्रक मागणी सुचना

**मौ. वाडीरत्नागिरी ता. पन्हाळा जि. कोल्हापूर येथील श्री केदारलिंग देवस्थानकडे सन २०२३ - २४ व सन २०२४ -२५ मधील चैत्र व श्रावण षष्ठी यात्रे करीता वॉकी टॉकी भाडेतत्वावर पुरविणे करीता दरपत्रक देणे बाबत**

मौ. वाडीरत्नागिरी ता. पन्हाळा जि. कोल्हापूर येथील श्री केदारलिंग देवस्थानकडे वर्षातुन दोन यात्रा साज-या करण्यात येतात सदर यात्रेच्या कालावधीमध्ये यात्रा नियोजन दृष्टीने प्रशासनातील अधिकारी यांनासमन्वय करीता वॉकी टॉकी पुरविणे आवश्यक आहे. सदर कामी वर्षामध्ये चैत्र यात्रा करीता दोन दिवसाकरीता व श्रावण षष्ठी यात्रा करीता १ दिवसाकरीता आवश्यक वॉकीटॉकी पुरविणे आवश्यक असते. त्यामुळे दि. ०१/०४/२०२३ पासुन ते दि. ३१/०३/२०२५ पर्यंत दोन वर्षाच्या कालावधीमध्ये आवश्यक वेळी आवश्यक संख्येमध्ये वॉकीटॉकी भाडयाने पुरविणेस तयार असल्यास खालील मसुद्याप्रमाणे दर देणेत यावेत.

| क्र. | यात्रा | वॉकी टॉकी संख्या | कालावधी | दर प्रति वॉकीटॉकी प्रति दिवस (सर्व करासहित व वाहतुकीसह) |
|---|---|---|---|---|
| १ | चैत्र यात्रा | ३० | २ दिवसाकरीता | रु. |
| २ | श्रावण षष्ठी यात्रा | १५ | १ दिवसकरीता | रु. |

वरील प्रमाणे कामांकरीता कंपनीचे लेटरपॅड वर सिलबंद दरपत्रक या कार्यालयाकडे दि. २४/०३/२०२३ रोजी सायंकाळी ४.३० वाजेपुर्वी पोहोच करणेत यावे. सदर सिलबंद दरपत्रकावर विषय, दरपत्रक देणा-यांचे नाव व संपर्क नंबर नमुद करावा. दरपत्रकासोबत पॅन कार्डची प्रत देणेत यावी

अटी व शर्ती खालील प्रमाणे

१. सदर कामाची समक्ष जागेवर तपासणी करुनच दरपत्रक देणेचे आहे.
२. सदर कामी संपुर्ण डोंगरावर रेंज येईल अशा पध्दतीने व्यवस्था करणेची आहे. त्याकरीता आवश्यक रिसिव्हर व ट्रान्समीटर बसविणे आवश्यक असलेस तो बसविणेचा आहे.
३. सदर वॉकी टॉकी यात्रा कालावधीच्या आधी एक दिवस कार्यान्वीत करुन देणेचे आहेत.
४. यात्रा कालावधीमध्ये तज्ञ व्यक्ती उपस्थित ठेवणेचा आहे.
५. सदर वॉकीटॉकी वापरणे बाबत प्रशिक्षण देणे आवश्यक असलेस तशी व्यवस्था करणेची आहे.
६. सदर दरपत्रकामध्ये नमुद करणेत येणारे दर हे सर्व करासहित, सर्व आवश्यक साहित्य व वाहतुक खर्चासहित देणेचे आहेत.
७. दरपत्रक मंजूर झाले दराशिवाय कोणत्याही कारणास्तव दर वाढवून दिले जाणार नाहीत.
८. सदर कामाची ऑर्डर मिळताच आवश्यक्तेप्रमाणे वॉकीटॉकी पुरविणेच्या आहेत. सदर कामी नमुद संख्येमध्ये कमी अगर जादा वॉकीटॉकींची आवश्यकता असलेस त्याप्रमाणे पुरविण्याच्या आहेत.
९. दिले मुदतीमध्ये दरपत्रक प्राप्त न झालेस स्विकारले जाणार नाही.
१०. दरपत्रकासोबत सोबत मक्तेदाराने पॅन कार्ड छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
११. दरपत्रकासोबत जीएसटी सर्टीफिकेट (लागू असलेस) त्याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
१२. सदरचे दर हे दोन वर्षाकरीता असलेने त्याकालावधीमध्ये मंजूर दरामध्ये कोणतीही वाढ दिली जाणार नाही.

20/03/2023

**सचिव**
**देवस्थान व्यवस्थापन समिती**
**पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर**

प्रत -

१) कार्यालयीन वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी
२) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर मुख्य कार्यालय नोटीसबोर्डवर प्रसिध्दीसाठी
३) श्री केदारलिंग देवस्थान उपकार्यालय, वाडीरत्नागिरी ता. पन्हाळा जि. कोल्हापूर नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
४) स्थानिक मंदिराकडे नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी